सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि - ०२४४२ २२२६०३ फॅक्स - ०२४४२ २२२६०१
ई मेल- principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011
"Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values." MSBTE CODE - 032

जा.क्र. शातंबी/ कार्यालय/२०२६/ 3000
दिनांक: 29 JUL 2026

## जाहीर निविदा

शासकीय तंत्रनिकेतन, बीड या संस्थेतील मातोश्री मुलींचे वस्तीगृहातील मेस चालवण्यासाठी आदेशित तारखेपासून शैक्षणिक एक वर्षातील कालावधी करिता मान्यता प्राप्त व अनुभव आणि परवाना धारकांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेतील सविस्तर नियम व अटी संस्थेच्या कार्यालयाच्या मुख्य सूचना फलकावर तसेच वसती गृहाच्या सूचना फलकावर पहावयास मिळतील. कुठल्याही सबबी शिवाय निविदा मंजूर करणे किंवा नामंजूर करण्याचे अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, बीड यांच्याकडे राखीव आहेत. निविदा स्वीकारण्याचा कालावधी दिनांक ३०/०७/२०२६ ते ०६/०८/२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत असेल. त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदा संस्थेच्या कार्यालयात स्वीकारल्या जातील. निविदा अर्जाची किंमत रुपये १०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) ना परतावा राहील.

संस्थेच्या कार्यालयात मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०७/०८/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, बीड यांच्या कक्षात उघडण्यात येतील. निविदा प्राप्त करण्यासाठी संस्थेतील मातोश्री मुलींचे वसती गृह लिपीक श्री बी.एच. बहिरवाल यांच्याकडे संपर्क साधावा. (भ्रमणध्वनी क्रमांक ९५७९३९३७६६)

(डॉ. ए. के. वाघमारे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, बीड

प्रत: 1) संस्थेतील मुख्य सूचनाफलक
2) संस्थेची संकेतस्थळावर निविदा प्रसिद्धीकरता
3) कुल मंत्री मातोश्री मुलींचे वसतिगृह शासकीय तंत्रनिकेतन, बीड

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन बीड
खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर मार्ग, बीड
दुरध्वनि – ०२४४२ २२२६०३ फॅक्स – ०२४४२ २२२६०९
ई मेल - principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेत स्थळ - www.gpbeed.ac.in
DTE CODE - 2011 MSBTE CODE - 032
"*Vision :- To make competent Engineering Professional with Ethical core values.*"

जा.क्र./शातंबी/कार्यालय/मेस / २०२६/ 3002
दिनांक 29 JUL 2026

प्रति,

____________________

खानावळ (मेस)सेवा पुरवठादार/ कंत्राटदार

विषय: संस्थेतील मातोश्री मुलींचे वसतिगृहातील खानावळ मेसचे दर पत्रक मागविणे बाबत

संदर्भ: १) जा.क्र./शातंबी/कार्यालय/2025/2550 दिनांक: 25 JUL 2025

२) दिनांक २८/०७/२०२६ रोजीची मुलींचे वसतिगृह आणि मेस सल्लागार समितीची प्राचार्य कक्षात झालेली बैठक

महोदय,

शासकीय तंत्रनिकेतन बीड या संस्थेतील मातोश्री मुलींचे वसतिगृहातील खानावळ (मेस) सुरू करण्यासाठी इच्छुक आणि पात्र सेवा पुरवठादार/ कंत्राटदार यांचेकडून विहित नमुन्यात आणि दोन लिफाफा पद्धतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत. लिफाफा क्रमांक ०१ मध्ये अटी व शर्ती मधील अनुक्रमांक २ नुसार मागवण्यात आलेली एकूण ११ कागदपत्रे ठेवण्यात यावीत.

लिफाफा क्रमांक २ मध्ये विहित नमुन्यातील दरपत्रक योग्य ते दर भरून आणि स्वाक्षरी करून ठेवावे. सदरील दोन्ही लिफाफे बंद करून एका मोठ्या लिफाफ्यात सील बंद करून प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन बीड या नावे दिनांक ०६/०८/२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील याची काळजी संबंधितांनी घ्यावी. मोठ्या लिफाफ्यावर उपहार गृह सेवेस दरपत्रक असे स्पष्ट उल्लेख करावा. उशिराने आलेल्या दर पत्रकांचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर लिफाफे दिनांक ०७/०८/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता वसतिगृह सल्लागार समिती सदस्या समक्ष उघडण्यात येतील. कंत्राट देण्यासाठीच्या प्रक्रियेमध्ये लिफाफा क्रमांक १ उघडून त्यामधील कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या सेवा पुरवठादार/कंत्राटदारांचाच पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल.

लिफाफा क्रमांक १ मधील कागदपत्रांची सेवा पूर्तता करणारा पुरवठादार/कंत्राटदारांचा लिफाफा क्रमांक २ उघडून दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येईल आणि उच्च दर्जा व न्यूनतम दर असलेल्या कंत्राटदारास वसतीगृहातील मेसचे कंत्राट देण्यात येईल.

लिफाफा क्रमांक १ मधील सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारा कोणीही सेवा पुरवठादार/कंत्राटदार उपलब्ध नसल्यास वसतिगृह सल्लागार समितीच्या शिफारसीनुसार काही कागदपत्राबाबत योग्य ती सूट मुदतवाढ देऊन सदरील प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

सेवा इच्छुक आणि पात्र पुरवठादार/ कंत्राटदार यांनी निविदा अटी व शर्ती आणि विहित नमुन्यातील दर पत्रक वसतिगृह सहाय्यक श्री. बहिरवाल बी. एच. (भ्रमणध्वनी क्रमांक ९५७९३९३७६६) यांचेकडून घेऊन निविदा शुल्क रुपये १०००/- (अक्षरी रुपये एक हजार) संस्थेचे रोखपाल यांच्याकडे जमा करावी.

(डॉ. ए. के. वाघमारे)
प्राचार्य

प्रत: संस्थेची वेबसाईट